दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.१९ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २३३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 19 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 233 ● Pages 4 ● Rate 4 Rs



**प्रतिनिधी नेमणे आहे**

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.


# आम्ही हिंदू आहोत, हिंदी नव्हे
# हिंदी लादण्याचा प्रयत्न करू नका
## दुबे तुम्ही मुंबईत येऊन दाखवा,समंदर मे डुबो-डुबो कर मारेंगे-राज ठाकरे

मुंबई (वृत्तसंस्था)-त्रिभाषा धोरणानंतर महाराष्ट्रातील वातावरण पेटलं असून सरकारला शेवटी हे धोरण मागे घ्यावं लागलं. त्यानंतर मुंबईत मराठी-हिंदी वाद पाहायला मिळाला. तसेच, भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांना आव्हान केले होते. तुम्ही उत्तर भारतात येऊन दाखवा, तुम्हाला पटक-पटक के मारेंगे असे दुबे म्हणाले होते. यावर आज मीरा रोडमध्ये बोलतांना राज ठाकरे यांना खासदार निशिकांत दुबे यांचा चांगलाच समाचार घेतला आहे.ठाकरे म्हणाले की-काही दिवसांपूर्वी बिहारचा खासदार दुबे हा आम्हाला म्हणतो की, तुम्ही आमच्याकडे येऊन दाखवा, तुम्हाला पटक पटक के मारेंगे. या खासदारावर केस झाली का? याचा विचार तुम्ही आम्ही करायला हवा. कारण या नेत्यांना बोलतांना माहिती असते की, सरकार आपल्या पाठिशी आहे. त्यामुळे ही अशा प्रकारची भाषा करत असतात. पण दुबे मी तुम्हाला सांगतोय की, तुम्ही मुंबईत येऊन दाखवा. तुम्हाला मुंबईच्या समुद्रात डुबो डुबो के मारेंगे.

### मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देऊन वर्ष झालं पण निधी नाही

कमीत कमी १४०० वर्ष जुनी भाषा असायला हवी. हिंदीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. या भाषेचा इतिहास १२०० वर्षांचा आहे आणि ती भाषा तुम्ही आमच्यावर लादणार का? हिंदीमुळे केवळ बॉलिवूडच्या नट आणि नट्यांचं भलं झालं. हिंदीमुळे तुम्ही का पुढे गेला नाहीत. मग तुम्ही आमच्या मुंबईत कामासाठी का येता? हिंदीने तुमचं काय भलं केलं? कोणती भाषा घेऊन बसले आपण? असा सवाल राज ठाकरे यांनी केला.ठाकरे पुढे म्हणाले, अन् या हिंदीसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पेटलेत. याचे काही मला समजू शकले नाही. हिंदी कुणाचीही राजभाषा होऊ शकत नाही. हिंदी ही इकडच्या तिकडच्या भाषा मिळून २०० वर्षापूर्वी तयार झालेली भाषा आहे. हिंदीने जवळपास १५०० भाषा मारल्या. आणि आपल्या मराठीला २००० वर्षांचा इतिहास आहे. तर मग तुम्ही कोणत्या दिशेने चालला आहात?



### गुजरातमध्ये बिहारींना हाकलून लावलं

बिहारमधील लोकाना माझं एक विचारणं आहे- २८ सप्टेंबर २०११ हिंमतनगरजवळ १४ महिन्याचा मुलीवर बलात्कार झाला. त्यानंतर बिहारी लोकांना मारहाण केली . जवळपास २० हजार लोकांना गुजरातमधून हाकलून लावले. तेव्हा तुम्हाला या घटनेच्या बातम्या दिसल्या का?, असा थेट सवाल राज ठाकरे यांनी केला.मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. शिवतीर्थावर मी मोदींना सांगितले होते मराठी भाषेला तुम्ही अभिजात भाषेचा दर्जा द्या. दर्जा मिळाला पण एक रुपया निधी मिळाला नाही. एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्यायचा असेल तर कमीत कमी १४०० वर्षांचा इतिहास हवा, हिंदीला अभिजात भाषेचा दर्जा मिळायला अजून १२०० वर्ष आहे. आणि ही भाषा तुम्ही आमच्यावर लादणार?

### महाराष्ट्रात मस्ती कराल तर फटका बसणारच-ठाकरे

राज ठाकरे व्यासपीठावर आल्यावर एकच जल्लोष पाहायला मिळाला. यावेळी तिथे घोडा आणलेला होता, ते पाहून राज ठाकरे म्हणाले, मी काय बोलतो हे माणसांना कळत नाही घोड्याला काय कळणार? यावेळी एकच हशा पिकला.मीरा भाईंदरला मी मुद्दाम आलो आहे. त्या दिवशी जो प्रसंग घडला होता, मिठाईवाल्याचा काही तरी झाला होता. कानावर मराठी बसत नसेल तर कानाखाली बसणारच. इथल्या व्यापाऱ्यांनी संप पुकारला, त्यांच्या कानाखाली मारली होती का? कुठल्या तरी पक्षाचे ऐकून हे संप वगैरे काढणार, तुम्हाला काय वाटले मराठी व्यापारी नाही? महाराष्ट्रात राहत आहात शांततेत राहा, मराठी शिका. इथे मस्ती करणार असाल तर फटका बसणार म्हणजे बसणार.काँग्रेसच्या काळापासून हे सुरू आहे. इतका प्रचंड मोठा लढा संयुक्त महाराष्ट्राचा झाला. मुंबईला महाराष्ट्रापासून बाजूला करायचा डाव होता, हा डाव गुजराती व्यापऱ्यांचा आणि गुजराती नेत्यांचा होता. मुंबई महाराष्ट्राला मिळू नये हे कोणी म्हटले होते वल्लभभाई पटेल यांनी सांगितले होते. त्यांना लोह पुरुष मानतो, आपण त्यांना आदर्श मनात होतो, त्यांनी महाराष्ट्राला विरोध केला. मोरारजी देसाई गोळीबार करून मराठी माणसाला ठार मारले होते. यांचा अनेक वर्षांपासून मुंबईवर डोळा आहे.

# ओमराजे निंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त भरघोस कार्यक्रमाचे आयोजन



**केज । प्रतिनिधी**

कळंब पासून अवघ्या १५ किमी अंतरावर बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील बोरगाव (बु.) हे गाव. गावातील युवक खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या कार्यशैलीने प्रभावित आहेत. खासदारांच्या जनसामान्यांच्या अडचणीला धावून जाण्याच्या आणि तत्परतेने कामे मार्गी लावण्याच्या शैलीने येथील युवकांना भुरळ घातली आहे. त्यामुळे येथील तरुणांनी एकत्र येऊन खासदारांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप बोरगाव येथील जि. प. प्राथमिक शाळेत केले. या कार्यक्रमाचे आयोजन दिनेश गव्हाणे, निलेश निंगुळे, अशोक गव्हाणे, धनंजय गव्हाणे, अर्जुन खडके, करण कवडे, गणेश गव्हाणे, ज्ञानेश्वर वळेकर, श्रीराम निंगुळे, योगेश रानमाळ, अमरसिंह गव्हाणे आणि शालेय शिक्षण समिती अध्यक्ष अमित गव्हाणे यांनी केले. शाळा उपयोगी शैक्षणिक साहित्याचे आणि खाऊचे वाटप यावेळी विद्यार्थ्यांना करण्यात आले.

खासदारांना अनभिज्ञ ठेवत त्यांच्या वाढदिवसाचा असा हा आगळा वेगळा सोहळा बोरगांव येथील युवकांनी साजरा केला. आणि त्यांना वाढदिवसानिमित्त दिर्घायुष्याच्या आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# खा.सुनिल तटकरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत निर्धार नवपर्वाचा
## पदाधिकारी संवाद मेळाव्यास उपस्थित रहा-शेख अमर

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे मा.मंत्री आ.धनंजय मुंढे, मा.आ.अमरसिंह पंडित,आ.विजयसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष अँड.राजेश्वर चव्हाण इतर मान्यवरांच्या उपस्थितीत निर्धार नवपर्वाचा - पदाधिकारी संवाद मेळाव्या चे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बीड जिल्ह्यातील आजी माजी आमदार,खासदार,प्रदेश पदाधिकारी,सर्व तालुकाध्यक्ष-शहराध्यक्ष,महिला,युवक युवती,फ्रंटल सेल चे अध्यक्ष व कार्यकारणी तसेच जिल्हा कार्यकारणी,जि.प.व प.स.सदस्य,आजी माजी नगराध्यक्ष,नगरसेवक,से.स.सो.चेअरमन, सरपंच,ग्रा.प.सदस्य,बाजार समिती सभापती-संचालक तसेच प्रमुख पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने या मेळाव्यास उपस्थित रहावे असे आवाहनमा. नगरसेवक तथा प्रदेश उपध्यक्ष शेख अमर जैनुद्दीन यांनी केले आहे.दि:- २० जुलै २०२५ वार,रविवार वेळ :- सकाळी ठिक :- १०:३० वाजता.ठिकाण स्व.यशवंतराव चव्हाण नाट्यगृह,बीड असे आव्हान शेख अमर जैनुद्दीन प्रदेशउपाध्यक्ष(कामगार अघाडी) रा.कॉ.पा.बीड यांनी केले आहे.



# नगरपालिके समोरच्या रस्त्याची मालकी कोणाकडे?
## प्रशासनाने आगोदर जाहीर करावे-उल्हास गिराम
### रस्त्याची झाली चाळण, रस्त्यासाठी नेमकं कोणतं प्रशासन?

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील प्रमुख रस्त्या पैकी एक असणारा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, या रस्त्याची चाळन झाली आहे. नगर पालिका, जिल्हापरिषद याचा मार्गांवर असुन या रस्त्यावर शेकडो लहान मोठे खड्डे पडले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी या रस्त्यावरील खड्या संदर्भात नगरपालिके कडे विचारणा केली तर संबंधित रस्ता आमच्या कडे नसून हा रोड सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ) कडे असल्याचे सांगितले, बांधकाम विभागाला विचारले असता त्यांनी नगर पालिकेकडे असल्याचे सांगितले. संबंधित रस्त्याचा मालक कोण? हे प्रशासनाने आगोदर जाहीर करावे, असे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी पत्रकात म्हंटले आहे. सोमवारी या रस्त्याच्या समस्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्याच्या भेटी घेणार असुन. येत्या महिनाभरात हा रस्ता नव्याने तयार व्हावा या साठी पाठपुरावा करणा असल्याचे उल्हास गिराम यांनी सांगितले. बीड शहरातील मुख्य बाजारपेठेत जाणारा हा मार्ग प्रमुख प्रशासकीय कार्यालयाला ही जोडला आहे. शाळा, महाविद्यालये, बाजार मुख्यालयाला हा प्रमुख रस्ता असुन अश्या उडवा उडवीच्या उत्तराने चीड निर्माण होत आहे. सामान्य जनतेच्या भावनांशी हे प्रशासन खेळत आहे. उप मुख्यमंत्री अजितदादा पवार सध्या जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत. त्यांनी या रस्त्याचे गांभीर्य घेऊन नव्याने तयार करावा या साठी त्यांना पत्र पाठवणार असल्याचे उल्हास गिराम यांनी कळवले.




# अणणाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी यशराज पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

डॉ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी युवा नेते यशराज भैय्या पंडित यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. शुक्रवार दिनांक १८ रोजी झालेल्या बैठकीत सदरील निवड जाहीर करून, उर्वरित कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. गेवराई येथील शासकीय विश्रामगृहात दिनांक १८ जुलै २०२५ रोजी डॉ. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीची बैठक घेण्यात आली असून, सर्वानुमते यशराज भैय्या पंडित यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्ष म्हणून प्रभाकर तात्या पिसाळ, मनोज तात्या हजारे, सचिव शरद नाना मोटे , ज्ञानेश्वर माऊली पवार, पप्पू गायकवाड, सहसचिव अण्णासाहेब राठोड लक्ष्मण चव्हाण, कोषाध्यक्ष उद्धव बापू मडके , सह कोशाअध्यक्ष ड. श्रीनिवास ढाकणे, ड. आबासाहेब सवाशे, माजी नगरसेवक रवींद्र बोराडे ,अरुण मस्के ,कार्याध्यक्ष रणजीत घुंभार्डे, सहकार्याध्यक्ष शिनूभाऊ बेद्रे , डिजिटल मीडिया प्रमुख रवींद्र पवार , संघटक सय्यद एजाज, किशोर वादे, प्रसिद्धी प्रमुख सुभाष सुतार, दिनकर शिंदे ,अमोल वैद्य यांची निवड करण्यात आली असून, मिरवणूक प्रमुख इनामदार, प्रभाकर भालशंकर, शेख अमजद बब्बू यांना संधी देण्यात आली आहे. सदरील कार्यकारणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली आहे. या बैठकीला राजाराम कानडे सर, खाजेकर सर, कमलाकर हातागळे, विलास अंकल सुतार, माजी नगराध्यक्ष ब्रह्मदेव धुरंधरे, माजी नगरसेवक भरत गायकवाड , ड. सोमेश्वर कारके संतोषजी सुतार, दीपक नाना सुतार , विजय दादा सुतार , प्रदीप सुतार ,रजनीकांत सुतार, विशाल जिजा थोरात , मायकल सुतार ,रणजीत सराटे ,राहुल सुतार , तीर्थराज धुरंधरे, प्रदीप कांबळे , विनोद कांबळे, राणू कानडे, अक्षय पवार, बल्ली भैया शिंदे, राजेंद्र सुतार , सुभाष सुतार, अमोल सुतार, अमोल मधुकर सुतार, बाळराजे थोरात, बंडू पवळे , विकास कारके इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.






## संपादकीय

# एआय देणार वाहन उद्योगाला पंख

नवी बुद्धिमत्तेला आव्हान देऊ पाहणारी कृत्रिम बुद्धिमत्ता हे मानवी कल्पनाशक्तीचे फलित म्हणावे लागेल. आपल्याच डोक्याच्या आणि शरीराच्याही बाहेर राहू शकणारा मेंदू विकसित करण्याची कल्पना अजून तरी फक्त माणूसच करू शकतो ना?

अशाच कल्पनाशक्तीचे फलित असणारा हा एआय आता वेगवेगळ्या व्यवसाय क्षेत्रांमध्ये कशा प्रकारे परिवर्तन आणू शकेल, याचे आडाखे बांधले जात आहेत. काही क्षेत्रांमध्ये याची चुणूक आपल्याला पाहायलाही मिळत आहे. वाहनउद्योगाचा त्यामध्ये समावेश होतो. या उद्योगामध्ये तंत्रज्ञान रूपात होऊ घातलेले आमूलाग्र बदल अचंबित करणारे आहेत.

आपला देश जगातील सर्वांत मोठा ट्रॅक्टर उत्पादक, दुसऱ्या क्रमांकाचा बस उत्पादक आणि तिसऱ्या क्रमांकाचा अवजड मालमोटारींचा उत्पादक आहे. या उद्योगाच्या विकासाचा दर सध्या ९ टक्के आहे. अमेरिकेतील ९१ टक्के घरांमध्ये सध्या चार चाकी वाहने आहेत, त्या तुलनेत भारतातील हे प्रमाण फक्त ८ टक्के आहे. तरीही आपला देश २०२६अखेरपर्यंत जगातील तिसऱ्या क्रमांकाची वाहन उद्योग बाजारपेठ होणार आहे. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या चार कोटी रोजगारांची निर्मिती आणि एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक एवढा या क्षेत्राचा सध्याचा आवाका आहे.वाहननिर्मितीच्या संकल्पनेपासून त्याच्या विक्रीपश्चात देखभालीपर्यंत वेगवेगळ्या टप्प्यांवर एआयचा अवलंब केला जात आहे. वाहनाची रूपरेखा तयार केल्यानंतर त्याच्या नमुना प्रतिकृती आणि डिजिटल जुळ्यांवर चाचण्या घेणे, त्यांच्या उत्पादन प्रकल्पांत नियोजन, रसदपुरवठा, गुणवत्ता नियंत्रण अशा वेगवेगळ्या टप्प्यांत सहभाग घेणे, बाजारपेठेचा अंदाज घेऊन त्यानुरूप पुरवठा व्यवस्थापन करणे, विक्रीसाठीच्या संभाव्य ग्राहकांच्या चौकशांना प्रतिसाद देण्यापासून स्थानिक बाजारपेठांनुरूप मागणीचा कल जाणून उत्पादन व पुरवठा नियोजन करणे, वाहनांच्या देखभालीच्या गरजा ओळखून त्याबाबत वाहनमालकाला वेळीच सावध करणे अशा बाबतींत एआयचा आता सर्रास वापर केला जात आहे. या तंत्रज्ञानामुळे उत्पादकही आता वाहनांमध्ये अनेक सोयी व वाहनांसोबत अनेक नव्या सेवांची भर घालू लागले आहेत. यामध्ये वाहनचालकाच्या चेहऱ्यावर सेन्सरद्वारे नजर ठेवून त्याआधारे सावधगिरीच्या सूचना देणे, पार्किंगसाठी जागा शोधण्याला मदत किंवा थेट स्वतःहून पार्किंग करणे, रस्ते व हवामान यांची माहिती देणे, ध्वनी सहायकाची मदत पुरवणे, वाहनाची स्थिती व चालवण्याच्या कौशल्याचे परीक्षण करून ती माहिती पुरवणे अशा सोयी-सेवा भारतातील वाहनउत्पादक आता पुरवू लागले आहेत. तूर्त तरी एआयच्या वापरामुळे वाहनांचा निर्मितीखर्च घटणे, उत्पादकता वाढणे, गुणवत्ता नियंत्रण सुधारणे असे परिणाम दिसू लागले आहेत. त्यासोबत, प्रदूषणात मोठी भर टाकणारा उद्योग हा या क्षेत्रावरील डाग काही प्रमाणात पुसण्यालाही हे तंत्रज्ञान साह्यभूत ठरणार आहे. वाहनांची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याला या तंत्रज्ञानामुळे गती मिळणार आहे. वाहनउत्पादन प्रकल्पांतील एआयची देखरेख व नियोजन यांमुळे वीजवापरात २५ टक्क्यांपर्यंत बचत होईल, असा अंदाज आहे. पुरवठा साखळीत येणारे व्यत्यय दूर करून उत्पादकता राखण्यालाही या तंत्राचा हातभार लागत आहे.या सर्व सकारात्मक बाबींबरोबर काही शंका आणि चिंताही या तंत्रज्ञानामुळे वाहन उद्योग क्षेत्रात पसरत आहेत. त्यात रोजगारसंधी घटण्याची भीती सर्वांत मोठी आहे. प्रत्येक तंत्रज्ञानाच्या सुरुवातीच्या काळात ही भीती व्यक्त होत राहिली असली, तरी एआयमुळे उत्पादन व देखभाल प्रक्रियेतील मनुष्यबळाची गरज नक्कीच कमी होणार आहे. माहिती विश्लेषण आणि ग्राहकसेवा यांमध्ये तर हे तंत्रज्ञान मानवी सहभागापेक्षा सरस कामगिरी उत्पादक कंपन्यांना आताच देऊ लागले आहे.खुद्द एआयचा तंत्रज्ञान विकास, त्याची देखभाल, त्यांवर आधारित यंत्रणांचे व्यवस्थापन, माहितीचे पृथःकरण व त्यांवर आधारित निर्णयप्रक्रिया अशा काही नव्या क्षेत्रांमध्ये नव्या रोजगारसंधी निर्माणही होतील, ही या काळ्या ढगांची सोनेरी किनार म्हणता येईल. परंतु तंत्रस्थित्यंतराच्या या प्रक्रियेत सध्या कार्यरत मनुष्यबळाने त्यादृष्टीने कौशल्यविकास साधणे आव्हानात्मक ठरणार आहे.वाहन उद्योगातील एआयच्या वापरामुळे काही आव्हानेही उभी राहणार आहेत. माहितीची गोपनीयता व सुरक्षितता हे त्यांपैकी सर्वाधिक चिंताजनक म्हणता येईल. त्यासाठी धोरणकर्त्यांकडून माहितीच्या सुरक्षिततेसाठी नियामक तरतुदी करणे अत्यावश्यक ठरणार आहे. माहितीची गळती होऊ नये, याची निश्चिती वाहनकंपन्यांनाही करावी लागणार आहे.एआयच्या अल्गोरिदममधील पूर्वग्रह हा अलीकडे संवेदनशील होऊ लागलेला विषय आहे. वाहन उद्योगालाही त्याची झळ बसली तर त्यातून उत्पादनाच्या अपेक्षित परिणामांपासून उत्पादक भरकटण्याचा धोका उद्भवेल. एआयच्या वापरावर उपस्थित होणारे नैतिकतेचे प्रश्नचिन्हही महत्त्वाचे ठरेल. ते पुसण्यासाठी या वापरात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि विश्वासार्हता यांबाबत तडजोड होणार नाही, हे पाहावे लागणार आहे.एआय आधारित वाहन उद्योग आणि भविष्यातील वाहने हा कुतूहलाचा आणि नवलाईचा विषय ठरत आहे. चालकरहीत स्वयंचलित वाहने आताच प्रगत देशांमधील रस्त्यांवरून धावूही लागली आहेत. आपल्या भोवतालच्या वाहतूक स्थितीचा अदमास लावून, त्यावर आधारित निर्णय घेऊन मानवी हस्तक्षेपाविना इच्छित स्थळी वाहन नेणारे हे तंत्रज्ञान टेस्ला, वायमो (गुगलची उपकंपनी) या उत्पादकांनी बाजारातही आणले आहे. डव्हान्स्ड ड्रायव्हर असिस्टन्स सिस्टीम्स (एडीएएस) ही या चालकरहीत वाहनांची झलक दाखवणारी आधीची पायरी म्हणता येईल. त्या तंत्रज्ञानावर आधारित वाहने भारतीय बाजारपेठेतही आता सर्रास दिसत आहेत आणि त्यांचा प्रचारामध्ये वापरही मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. सेन्सस व कॅमेरे यांवर आधारित या तंत्रज्ञानामुळे वाहनासमोर येणारे अडथळे ओळखणे, तीव्र वळणांचा अंदाज घेणे येथपासून स्वतःहून ब्रेक लावणे, वाहतूक स्थितीनुसार वेग नियमन करणे असे अनेक पर्याय उपलब्ध केले जातात. त्यातून वाहन चालवणे सुकर आणि सुखकर तर होतेच; परंतु ते सुरक्षितही होते.या सर्व तंत्रप्रगतीतून आता कनेक्टेड कार ही एक संकल्पना प्रत्यक्षात येत आहे. यामध्ये इंटरनेट ऑफ थिंग्ज या तंत्रज्ञानाचाच विस्तार करून आपले वाहन, स्मार्टफोन, स्मार्टवॉच आणि अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे एकमेकांशी जोडली जातात. त्यामुळे आपल्या वाहनातील काही सोयींचा दूरनियंत्रकाद्वारे वापर, वाहतूक व हवामान स्थितीची तत्काळ माहिती, अपघातस्थितीत आपत्कालीन सेवांशी परस्पर संपर्क असे आणखी भविष्यवेधी पर्याय उपलब्ध होतात.कनेक्टेड कार हा मानवी कल्पनाशक्ती आणि एआय-आधारित तंत्रसर्जकता यांचा संगम असेल. त्याची चुणूक तर भारतामध्ये उपलब्ध असणाऱ्या वाहनांतूनही आता दिसू लागली आहे. कल्पनाशक्ती नसली तरी कल्पना साकारण्याची क्षमता ही आता माणसापुरती मर्यादित राहिलेली नाही, हे एआय दाखवून देत आहे. त्यातील पुढचे पाऊल मानवी मेंदूच्याही कक्षा विस्तारणारे असेल की त्याला आव्हान देणारे, हे मात्र भविष्यातच स्पष्ट होईल.




# तुलसी : फॅशन डिझायनिंगच्या क्षेत्रात यशस्वी वाटचाल

तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझायनिंग, बीड, देवगिरी प्रतिष्ठानद्वारे चालवला जाणारे प्रतिष्ठित कॉलेज आहे. २०१६ मध्ये स्थापित झाल्यानंतर, या महाविद्यालयाने बीड शहरात विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी एक उत्साही प्रारंभ केला आहे. हे महाविद्यालय महिलांच्या फॅशन डिझायनिंगमध्ये कौशल्य प्राप्त करण्यासाठी एक महत्त्वाचे ठिकाण म्हणून कार्यरत आहे.

**महाविद्यालयाची उद्दिष्टे**

तुलसी कॉलेजचे मुख्य उद्दिष्ट फॅशन डिझायनिंगच्या माध्यमातून विद्यार्थिनींना जागतिक दर्जाचे कौशल्य प्रदान करणे आणि त्यांना स्वावलंबी बनवणे आहे. हे महाविद्यालय केवळ महिलांसाठी सुसज्ज आहे, ज्यामुळे ग्रामीण भागातील मुलींना योग्य शिक्षण आणि कौशल्य प्राप्त करण्याची संधी मिळते.

**अभ्यासक्रम आणि प्रशिक्षण**

तुलसी कॉलेजमध्ये विद्यार्थिनींना सर्जनशीलतेसाठी विविध कौशल्ये शिकविली जातात. त्यात धागा तयार करणे, कापड तयार करणे, रंगकाम करणे आणि विविध प्रिंटिंग तंत्र शिकवले जातात. याशिवाय, विद्यार्थिनींना कपडे शिवण्याचे कौशल्य देखील प्रदान केले जाते, ज्यामुळे ते सर्व वयोगटातील व्यक्तींसाठी कपडे तयार करू शकतात.



**प्रगतीशील उपक्रम**

महाविद्यालयाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय फॅशन शोमध्ये सहभाग घेऊन विद्यार्थिनींचे आत्मविश्वास वाढवला आहे. लवकरच तुलसी क्रिएशन नावाने एक अद्वितीय शो-रूम सुरू होईल ज्यामध्ये विद्यार्थी विविध वस्त्र, दागिने आणि अन्य सेवा उपलब्ध करून देतील.

**सक्षमीकरणाचे कार्य**

महाविद्यालयाने बीड जिल्ह्यात विविध तालुक्यात तुलसी इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी सुरू केले आहे, ज्यामुळे अधिक मुलींना शिक्षण घेणे सुलभ झाले आहे. वसतीगृह आणि बसच्या सुविधेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना शिक्षणाची संधी मिळत आहे.

**यशोगाथा**

महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी विविध फॅशन कार्यक्रमांमध्ये भाग घेऊन महाविद्यालयाचा मान उंचावला आहे, विशेषतः २०२१ मध्ये ग्रीन फॅशन इंडिया परिषदेत. त्यांच्या अनोख्या डिझाइनने प्रथम क्रमांक मिळवला.

**करिअरच्या संधी**

फॅशन डिझायनिंग कोर्स पूर्ण झाल्यानंतर, विद्यार्थिनींना विविध क्षेत्रांमध्ये काम करण्याची संधी मिळते. त्या फॅशन डिझायनर, इलस्ट्रेटर, काउन्सलर, किंवा स्वयंरोजगाराच्या माध्यमातून घरबसल्या सुवर्ण संधी साधू शकतात.तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझायनिंगने फॅशन व कौशल्यांच्या क्षेत्रात अनोखी किमानिका स्थापन केली असून, यामुळे महिलांचे सक्षमीकरण व आत्मनिर्भरता साधणे शक्य झाले आहे.

## श्रीगोंदा तालुक्यातील सध्याच्या घडीला चर्चेत असलेले नाव म्हणजे

# पुरुषोत्तम यशवंत लगड सरदार उर्फ भैया लगड

**भैय्या लगड हे श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाचे रहिवासी परंतु आपल्या कौटुंबिक अडचणी मुळे काही काळ दौंड येथे त्यांच्या मामा कडे आपले वास्तव्य केले. व्यायाम व पैलवानकी याची आवड असल्याने भैय्या लगड यांनी काही वर्ष कोल्हापूर येथील तालमीत घालवली. भैय्या यांचा जन्म १९ जुलै १९८५ रोजी मामाच्या गावी दौंड येथे झाला. लगड सरदार घराणे हे राजकीय वारसा असलेले प्रतिष्ठित घराणे. आई सुनंदा व वडील यशवंत यांनी त्यांना खूप लाडात वाढवले.यांनी आपले इ- पर्यंत चे शिक्षण दौंड येथे पूर्ण केले. परंतु त्यांचे आजोबा कोळगाव सोसायटी चे माजी चेयरमन कै.गणपतराव लगड उर्फ जी. के भाऊ ज्यांना १९७२ च्या दुष्काळात लोकांना सोसायटी चे धान्य मोफत वाटले म्हणून दीड वर्ष भोगलेला तुरुंगावास,या आपल्या आजोबा कडून मिळालेले राजकीय बाळकडू त्याचप्रमाणे दौंड चे पवार कुटुंबीय सुद्धा राजकीय आजोबा कै.नानासाहेब पवार कृषी उत्पन्न बाजार समिती दौंड चे सभापती होते, मामा आप्पासाहेब पवार हे सुद्धा माजी सभापती असून सध्या शरद पवार राष्ट्रवादी गटाचे दौंड तालुका अध्यक्ष आहेत. त्याच प्रमाणे मामी सौं.रोहिणी ताई पवार या देखील कृषी उत्पन्न बाजार समिती दौंड च्या सभापती होत्या.या पवार कुटुंबियांकडून मिळालेले राजकीय ज्ञान हे त्यांना काही स्वस्थ बसू देत नव्हते.**

अखेर वयाच्या २२ व्या वर्षी २००९ साली त्यांनी आपल्या मूळ गावी कोळगाव या ठिकाणी सामाजिक व राजकीय कार्यास सुरवात केली.सुरवातिला त्यांचेच जवळची लोक त्यांना राजकारण व समाज कारण यापासून दूर राहून काही उद्योग व्यवसाय करण्यास सांगत, परंतु तरुण रक्त व समाजासाठी काहीतरी करून दाखविण्याची जिद्द मनात ठेऊन कोळगाव राजकारणात तरुणांच्या सहकार्याने पहिली सोसायटी निवडणूक केली ज्या ठिकाणी त्यांच्या पार्टीचा अतिशय दारुण पराभव झाला.फक्त ५ सदस्य निवडून आले.त्यानंतर झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत परिस्थिती अशी होती कि समोरील पार्टी समोर कोणी उमेदवार ही उभा राहत नसे. परंतु त्या परिस्थिती मध्ये माजी मंत्री बबनदादा यांच्या पाठबळावर त्यांनी पॅनल तयार केला,यामध्ये सुरवातीस ७ उमेदवार विजयी झाले, ज्या मध्ये भैय्या यांच्या मातोश्री सुनंदा ताई प्रचंड बहुमताने निवडून आल्या. त्यानंतर झालेल्या सोसायटी निवडणुकीत त्यांना पुन्हा एकदा दारुण पराभावाला सामोरे जावे लागले, त्यांच्या पॅनल मधील फक्त ते एकटेच निवडून आले.पुढील ग्रामपंचायत इलेक्शन मध्ये १७ पैकी १० सदस्य निवडून आले परंतु सरपंच पद जनतेतून असल्याने ते विरुद्ध पार्टी कडे गेले तरीही त्यांनी हार मानली नाही.उपसरपंच पदी आपल्याच पार्टी चे उमेदवार निवंडून आणून त्यांच्या सहकार्याने सर्वांना सोबत घेऊन ५ वर्ष ग्रामपंचायत मध्ये अतिशय पारदर्शी कारभार करून विरोधकांवर अंकुश ठेवला. याचेच फळ आणि केलेली कामे, तरुणांची फौज, जनसंपर्क, आणि २४ तास जनतेसाठी उपलब्धी या पंचसूत्री जिवावर भैय्या लगड यांनी २०१७ साली पंचायत समिती निवडणुकीत निवडून आले . आदरणीय बबनदादा व सदा अण्णा पाचपुते यांनी त्याचे कर्तृत्व हेरल्याने पंचायत समिती सभापती पदाची माळ भैय्या यांच्या गळ्यात पडली. अडीच वर्ष श्रीगोंदा पंचायत समिती सभापती असताना संपूर्ण तालुका हागणदारी मुक्त करण्याचे महत्वाकाक्षी काम केले. त्याचप्रमाणे सभापती पदी काम करत असताना अतिशय अभ्यासपूर्ण कामकाज करून संपूर्ण तालुक्यातील प्रश्न सोडवण्याचे काम पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली केले. या काळात त्यांना नगर दक्षिण खासदार साहेब सुजयदादा विखे



यांचेही सहकार्य मिळाले. पाचपुते व विखे या जोडगोळी च्या माध्यमातून त्यांनी कोळगाव गण व जिल्हा परिषद गटामध्ये विकास कामाचा अक्षरशः पाऊस पडला. त्यांच्या कामाचा ओघ पाहून संपूर्ण तालुक्यात भैय्या यांच्या नावाचा गौरव सुरु झाला.परंतु पंचायत समिती व जिल्हा परिषद इलेक्शन लांबणीवर पडले. त्यातच कोळगाव ग्रामपंचायत ची निवडणुका लागली. एक कार्यक्षम सरपंच गावाचा कसा कायापालट करू शकतो हे दाखवून देण्यासाठी, पुन्हा एकदा सरपंच पदासाठी फॉर्म भरला. आणि बहुमताने निवडून आले. लोकनियुक्त सरपंच पद व ११ सदस्य असे बहुमत मिळाले कोळगाव ग्रामपंचायतीवर एक हाती सत्ता स्थापित करून आपले जवळचे कट्टर सहकारी संतोष काका मेहेत्रे यांच्या पत्नी मायाताई यांना उपसरपंच केले. या संपूर्ण राजकीय वाटचाली मध्ये विरोधक त्याचप्रमाणे काही स्वकीय यांनी सुद्धा त्यांना अनेकदा खिंडीत पकडण्याचे कट कारस्थान रचले, पण हार मानेल तो भैय्या कसला. सर्व अडचणीवर मात करत गावच्या विकासासाठी सर्व सदस्यांना, जेष्ठ मंडळी,तरुणांना सोबत घेऊन विकासासाठी वेगळी दिशा देत विविध विकास कामांचा धडाका लावत लाखो रुपयांची कामे आपल्या अभ्यासपूर्ण कामातून व सदस्यांच्या व तरुणांच्या सहकार्याने सुरु केली या मध्ये रस्ते, दरवर्षी वाढदिवसाच्या निम्मित घेण्यात येणारे रक्तदान शिबीरे,दुष्काळ असताना जनावरासाठी चालवलेल्या छावण्या, बंद पडलेले शहिद भवन कार्यालय आज उर्जित अवस्थेत आणले, स्मशानभूमी शेड, दशक्रिया विधी शेड, त्या ठिकाणी माफक दरात पुरविण्यात येणारे स्पीकर साऊंड सिस्टीम, गरम पाणी, महिला बचत गट कार्यालय, फिल्टर पाणी, महिला बचत गटासाठी कार्यालय,ग्रामसचिवालय,लाईटचे खांब, वाडी वस्तीवर अक्षय प्रकाश योजना,शासकीय योजना,राष्ट्रीय पेयजल योजना, घरकुले,नागरिकांच्या वैयक्तिक लाभच्या अनेक योजना आणल्या. ग्रामदैवत कोळाई देवींची यात्रा उत्सव, नवरात्र मध्ये महिलासाठी घेतलेलं कार्यक्रम,अनेकदा वीज प्रश्ना संदर्भात आंदोलन, कोळगाव मध्ये ीं आत यावी यासाठी आंदोलन, वीज बिल माफी साठी केलेले आंदोलन अशी अनेक कामे आज कोळगाव चे बदलते रूप भैय्या यांच्या कर्तृत्वाची साक्ष देत आहे. येत्या काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भैय्या हे नाव उमेदवारी करो अथवा न करो पण किंगमेकर ची भूमिका नक्की बजावणार यात तिळमात्र शंका नाही. भैय्या लगड यांच्या यशाचे त्रिसूत्री म्हणजे कठोर परिश्रम, कष्ट आणि कधीही हार्दिक न मानण्याची जिद्द अशा या कर्मयोगी, तत्वनिष्ठ, तालुक्यातील तरुणांच्या आदर्श असलेल्या लोकनियुक्त सरपंच तसेच माजी सभापती भैय्या यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

### उपमुख्यमंत्री अजित पवार व आ.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त

# रविवारी भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन-डॉ.इंगोले यांची माहिती

### गरजूंनी लाभ घ्यावा आयोजक राजकिशोर (पापा) मोदी मित्र मंडळाचे आवाहन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार व आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार, दिनांक २० जुलै रोजी अंबाजोगाईत भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी दिली आहे. तर आरोग्य तपासणी शिबिराचा गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक राजकिशोर (पापा) मोदी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. शहरातील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांच्या समाधान मानसोपचार रूग्णालय व व्यसनमुक्ती केंद्र व नेत्रालय, हाऊसिंग सोसायटी, पंचायत समिती जवळ, अंबाजोगाई या ठिकाणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार व आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार, दिनांक २० जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत या वेळेत अंबाजोगाईत भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात भव्य मोफत व्यसनमुक्ती शिबीर, मोतीबिंदू निदान व शस्त्रक्रिया शिबीर, मतिमंदत्व तपासणी व प्रमाणपत्र वाटप शिबीर, पत्रकार आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. १५ जुलै रोजी माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री आमदार धनंजय मुंडे यांचा वाढदिवस आहे. २२ जुलै रोजी राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांचा वाढदिवस आहे. त्यानिमित्ताने अंबाजोगाईत भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात भव्य मोफत व्यसनमुक्ती शिबीर, मोतीबिंदू निदान व शस्त्रक्रिया शिबीर, मतिमंदत्व तपासणी व प्रमाणपत्र वाटप शिबीर, पत्रकार आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी दिली आहे. तर आरोग्य तपासणी शिबिराचा गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक राजकिशोर (पापा) मोदी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. सदरील शिबिरात तपासणी करीता नांवनोंदणी करणे आवश्यक आहे. तरी पुर्व नांवनोंदणी करण्यासाठी तसेच ज्यांना या शिबिराचा लाभ घ्यायचा आहे. अशा रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी पुढील मोबाईल (नंबर - ९५२९८९३०३०) संपर्क साधावा असे आवाहन आयोजक राजकिशोर पापा मोदी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.




## महाराष्ट्रातील दोन 'सेना' एकत्र: एकनाथ शिंदे यांना आनंदराज आंबेडकरांची साथ



**मुंबई (वृत्तसंस्था)**-आनंदराज आंबेडकर यांचा रिपब्लिकन सेना पक्ष आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना पक्ष यांच्या युतीची अधिकृत घोषणा आज करण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून या युतीची चर्चा होती. आज एकनाथ शिंदे आणि आनंदराज आंबेडकर यांनी एकत्र पत्रकार परिषद घेत आपल्या युतीची अधिकृत घोषणा केली. शिवशक्ती-भीमशक्ती एकत्र येत प्रबोधनकार ठाकरे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुढे नेण्याचा हा प्रयत्न असल्याचे या वेळी या दोन्ही नेत्यांनी सांगितले.लोकांच्या भल्यासाठी आम्ही एकत्र आलो असल्याचा दावा एकनाथ शिंदे यांनी केला आहे. आमच्यात एकमेकांबद्दल विश्वास असल्याचेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. या महाराष्ट्रातील दोन सेना आहेत. शिवसेना आणि रिपब्लिकन सेना या दोन्ही रस्त्यावर अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सेना असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. यातील एक सेना बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा घेऊन चालणारी असून दुसरी सेना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रक्ताचा वारसा घेऊन चालणारी सेना असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. त्यामुळेच आमच्यात एकदम चांगले जमेल, अशा शब्दात एकनाथ शिंदे यांनी युतीची घोषणा केली आहे.

### नदीजोड प्रकल्प हा राज्यासाठी वरदान

# सर्व सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध-मंत्री गिरीश महाजन



**मुंबई (वृत्तसंस्था)**-राज्यातील दुष्काळी भागाला पाणी पोहोचवण्याच्या दृष्टीने नदीजोड प्रकल्प महत्त्वाचा असून हा प्रकल्प राज्यासाठी वरदान असल्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी विधान परिषदेत प्रस्तावाला उत्तर देताना सांगितले.

राज्यात अनेक नदीजोड प्रकल्प सुरू असून वैनगंगा - नळगंगा हा सर्वात मोठा प्रकल्प आहे. त्यासोबतच नार पार गिरणा, कोकणातील सावित्री, गोदावरीचे कोकण खोरे, उल्हास, वैतरणा तसेच तापी खोऱ्यातही अनेक प्रकल्प राबवण्यात येणार आहेत. अतिरिक्त पाणी असलेल्या खोऱ्यातून कमी तसेच पाणी नसलेल्या नदी खोऱ्यात पाणी पोहचवण्याची शासनाची भूमिका असल्याचेही मंत्री महाजन यांनी सांगितले.

यासोबतच राज्यात अनेक सिंचन प्रकल्प आहेत. अपूर्ण असणारे सिंचन प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात येत आहे. तसेच तापी खोऱ्यामध्ये मेगा रिचार्ज प्रकल्प राबवण्यात येत असून यासाठी मध्य प्रदेश सरकार सोबत सामंजस्य करारही करण्यात आला आहे. बळीराजा योजना, प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना या माध्यमातून सिंचन क्षेत्र वाढवण्यावर भर देण्यात येत असल्याचेही मंत्री महाजन यांनी सांगितले.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या विविध प्रलंबित विषयांचा आढावा

मंत्री महाजन यांनी विधान भवन, मुंबई येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या समवेत नागपूर व अमरावती जिल्ह्यातील जलसिंचन प्रकल्पांचा कामांची आढावा बैठक देखील घेतली. सदर बैठकीत गोसेखुर्द प्रकल्प, पेंच प्रकल्प, अमरावती जिल्ह्यातील प्रकल्प, चिंचघाट प्रकल्प, जिगांव प्रकल्पाच्या भूसंपादनाचा वाढीव मोबदला, तसेच विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या शासनाकडील विविध प्रलंबित विषयांचा आढावा घेण्यात आला. याप्रसंगी आमदार चरणसिंग ठाकूर यांच्यासह अन्य मान्यवर व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### साहेबांनी मला दोनदा प्रदेशाध्यक्षपदाची संधी दिली

# सात वर्षांच्या काळात एकदाही सुट्टी घेतली नाही, भाषणावेळी जयंत पाटील भावुक



**मुंबई (वृत्तसंस्था)**-राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी आज अखेर आपल्या प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. यानंतर, पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी नव्या प्रदेशाध्यक्षपदी शशिकांत शिंदे यांच्या नावाची घोषणा केली. राजीनामा देण्यापूर्वी जयंत पाटील यांनी भावनिक होत गेल्या सात वर्षांच्या आपल्या कार्याचा आढावा आणि पक्षासाठी घेतलेल्या मेहनतीची माहिती दिली. मला शरद पवारांनी अध्यक्षपदाची संधी दोनदा दिली. सात वर्षे काम करत असताना एकदाही सुट्टी घेतली नाही. तसेच, बायकोलाही मी हे सांगितले, असे जयंत पाटील म्हणाले.आपल्या भाषणाची सुरुवात करताना, छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान मिळाल्याबद्दल जयंत पाटील यांनी आनंद व्यक्त केला. त्यानंतर, त्यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. साताऱ्यातील पुसेसावळी येथे झालेल्या दंगलीचा उल्लेख करत, शिवाजी महाराजांनी उभारलेल्या स्वराज्यावर आता उत्तरेकडील प्रभाव दिसून येत असल्याचे ते म्हणाले. तसेच, हिंदी भाषेच्या सक्तीच्या प्रयत्नांवरून आणि मुंबई महापालिका निवडणुकीत विशिष्ट समाजाला खुश करण्याच्या कथित प्रयत्नांवरून त्यांनी सरकारला घेरले. जयंत पाटलांनी भाषणाची सुरुवात करतानाच, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांना वर्ल्ड हेरिटेज यादीत घालण्यात आल्याबद्दल आनंद व्यक्त केला. तसेच, साताऱ्यातील पुसेसावळी येथे धर्मावरून दंगल घडली. छत्रपती शिवाजी महाराजांनी जे स्वराज्य निर्माण केलं, त्यावर आता कुठेतरी उत्तरेतील प्रभाव दिसू लागला आहे. उत्तरेतील काही राज्यातील लोकांना खुश करण्यासाठी हिंदी सक्तीचे प्रयत्न झाले. मुंबई महापालिका निवडणुकात एका विशिष्ट समाजाला खुश करण्यासाठी हा प्रयत्न करण्यात आला, असे म्हणत जयंत पाटलांनी सरकावर हल्लाबोल केला.

राज्यातील शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेवरही जयंत पाटील यांनी प्रकाश टाकला. शेतकरी रोज विविध संकटाना तोंड देत आहे, शेतकऱ्याने बैल नाही म्हणून नांगरला जुंपून शेती करत असल्याचे चित्र महाराष्ट्राने पहिल, असे कधी आधी झाले नव्हते. सातबारा कोरा करू, अशी आश्वासने महाराष्ट्रातील जनतेने ऐकली आहेत, असे म्हणत त्यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला.विधानसभेला आपण खूप ताकद लावली परंतु यश मिळाले नाही. आता बिहारमध्ये सगळी मतदारयादी नव्याने करत आहेत. ३५ लाख मतदार यांनी बाद केले, असं प्रत्येक राज्यात केल जाईल. आता हे विविध राज्यात होईल, असा संभाव्य धोकाही जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

जयंत पाटील यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या कालावधीत पक्षाने लढलेल्या निवडणुकांची आठवण करून दिली. आमच्याकडे दोन अमोल होते. अमोल कोल्हे आणि अमोल मिटकरी. त्यापैकी मिटकरी तिकडे गेले, पण आम्ही ५४ जागा जिंकल्या, १७% मते मिळाली. त्यावेळी सत्ता आली आणि कोव्हिड आला. राजेश टोपे यांचे काम कुणीही विसरणार नाही. पण, मतदारसंघांतील लोक कसे विसरले माहिती नाही, असे म्हणत टोपे यांच्या पराभवाबद्दल खंत व्यक्त केली.जयंत पाटील पुढे म्हणाले, मधल्या काळात पक्ष फुटला, आम्ही त्यावेळी पॅनिक न होता जागेवर राहण्याचा निर्णय घेतला आणि अपात्रतेची कारवाई करण्याबाबत आम्ही त्याचरात्री विधानसभा अध्यक्षांकडे प्रस्ताव दिला. लोकसभेला आपल्याला प्रचंड यश मिळाले. इथे बसलेले ८ खासदार हे शरद पवार यांच्या कष्टाचे फळ आहे. शरद पवार यांनी प्रचंड काम केले. निवडणूक आयोगाकडून उलटा निकाल, त्यामुळे महाराष्ट्रातील जनता प्रचंड नाराज झाली. जनतेने आपल्याला साथ दिली. आपण लोकसभेला १० जागा लढवल्या आणि प्रचंड मेहनत घेतली.

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाला सुरूवात


**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**-श्री संत शिरोमणी सावता महाराज संजीवन सोहळ्यानिमित्त अंबाजोगाईत दिनांक १६ ते २२ जुलै दरम्यान ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी ग्रंथ दिंडी व संत सावतामाळी पालखी भव्य सवाद्य मिरवणूक, आतिषबाजी, भाविक भक्तांच्या जयघोषात सप्ताहास सुरूवात झाली. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शहरातील संत सावतामाळी मंदिर, आद्यकवी मुकुंदराज रोड, अंबाजोगाई (जि.बीड.) या ठिकाणी आयोजित श्री संत सावता महाराज महात्म्य कथा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे.

अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ बुधवार, दिनांक १६ जुलै रोजी सकाळी साडे आठ वाजता जिरे गल्ली येथून ग्रंथ दिंडीने झाला, सवाद्य मिरवणूक, आकर्षक पालखी सजवून, भगव्या पताका खांद्यावर घेऊन, टाळ-मृदंग-वीणा घेऊन विठोबा- रखुमाई, ज्ञानदेव-तुकाराम नामाचा गजर करीत लहान मुले व मुली विठ्ठल-रखुमाई, विविध संत यांची वेशभूषा करून तर महिला भगिनी यांनी कलश सजवून, तुळशी वृंदावन आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी घेऊन या मिरवणुकीत सहभाग घेतला.

यावेळी ज्येष्ठ नागरिक, युवक हिरीरीने सहभागी झाले होते. त्यानंतर सकाळी आकरा वाजता कलश पूजन व टाळ-वीणा-मृदंग पूजन हस्ते ह.भ.प.किसन महाराज पवार, ह.भ.प.गुरूवर्य प्रेममुर्ती अरूण महाराज बर्दापूरकर, ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, कल्याण आखाडे, आनंद शंकरराव शिंदे, ह.भ.प.अरूण महाराज शिनगारे, ह.भ.प.अमोल महाराज घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर ह.भ.प.महेश महाराज येरोळकर, मूंदगाचार्य ह.भ.प.गणेश आढाव, ह.भ.प.ऋषि महाराज मोरवडकर, ह.भ.प.दिपक महाराज कोरडे, गायनाचार्य ह.भ.प.महेश महाराज येरोळकर, भजनी मंडळ : श्री मुकुंदराज गुरूकुलचे सर्व विद्यार्थी (मुकुंदराज स्वामी मंदिर,अंबाजोगाई) हे होते.

यावेळी ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, कल्याण आखाडे, ह.भ.प.अरूण महाराज शिनगारे, ह.भ.प.किसन महाराज पवार यांनी ही आपले समायोचित विचार व्यक्त केले. तर सुत्रसंचालन राम घोडके यांनी केले. या सप्ताहाची सांगता बुधवार, दि.२३ जुलै रोजी ह.भ.प.गुरूवर्य प्रेममुर्ती अरूण महाराज बर्दापूरकर यांचे काल्याचे किर्तन सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत होवून त्यानंतर महाप्रसाद होईल. सप्ताहाचे आयोजनासाठी संयोजन समितीचे अध्यक्ष अंकुश घोडके, उपाध्यक्ष सुरेश बलुतकर, अनंत अरसुडे, सचिव अर्जुन वाघमारे, सहसचिव भागवत मसने, कोषाध्यक्ष संतोष राऊत, राम घोडके, सदस्य सर्वश्री बळीराम चोपणे, प्रकाश बलुतकर, लक्ष्मण पाथरकर, मधुकर जिरे, नामदेव माळी, दत्तात्रय घोडके, रमेश जिरे, बबन घोडके, दशरथ जिरे, बालासाहेब मसने, अशोक बलुतकर, बालासाहेब माळी, प्रदीप जिरे, विष्णु राऊत, सुभाष चोपणे, डॉ.सुरेश अरसुडे, डॉ.दिपक फुटाणे, बालासाहेब चोपणे, विठ्ठल शिंदे, रमेश घोडके, सिद्राम घोडके, मधुकर घोडके, अशोक जिरे, तुषार करपुडे, बालासाहेब घोडके, संतोष जिरे, गोविंद पाथरकर, पवन जिरे, योगेश डाके, महेश सपाटे, आशिष आढाव, अभिजीत जिरे, शरद माळी, तुकाराम माळी, मंगेश बलुतकर, नितीन जिरे, दिपक गिरे, बबनराव जाधव, पंकज राऊत यांनी तसेच संयोजक, समस्त माळी समाज अंबाजोगाई यांनी पुढाकार घेतला आहे.

## सेवा सप्ताह अंतर्गत वृक्षारोपण व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप संपन्न



**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**-महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना अजितदादा पवार तसेच माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह अंतर्गत दुसऱ्या दिवशी दि.१६ रोजी मोदी लर्निंग सेंटरच्या प्रांगनाभोवती विविध झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच गुरुवार दि. १७ रोजी मानव विकास अपंग व मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सात दिवस सात उपक्रम या संकल्पनेनुसार १५ ते २२ जुलै दरम्यान आज दुसऱ्या दिवशी दि १६ रोजी वृक्षारोपनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. या अंतर्गत मोदी लर्निंग सेंटरच्या भव्य अशा प्रांगनाभोवती विविध प्रकारच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.त्याचबरोबर गुरुवारी जोधाप्रसादजी मोदी तसेच मानव विकास अपंग व मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत वह्या, पेन, पेन्सिल चित्रकला वही, रंग पेन्सिल आदींचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी राजकिशोर मोदी तथा ऍड राजेश्वर चव्हाण यांच्या संकल्पनेखाली सेवा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी तसेंच बीड जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांच्या पुढाकाराने १५ ते २२ जुलै दरम्यान सात दिवस सात उपक्रम या संकल्पनेवर आधारित अंबाजोगाई शहरात सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात आरोग्य, पर्यावरण,स्वच्छता, शिक्षण तथा सामाजिक जनजागृती यावर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.१५ रोजी रक्तदान शिबीर आयोजित करून त्यात ६३ युवकांनी स्वेच्छेने रक्तदान केले. बुधवार दि १६ रोजी मोदी लर्निंग सेंटर येथे वृक्षारोपण करण्यात आले. यापुढेही संपूर्ण सप्ताहभर अशाच विधायक उपक्रमांची मेजवानी असणार आहे. सेवा सप्ताह उपक्रमा अंतर्गत वृक्षारोपण तसेच शालेय साहित्य वाटपाच्या कार्यक्रमात मनोज लखेरा, मानसोपचार तज्ज्ञ डॉ राजेश इंगोले,महादेव आदमाने, चंद्रकांत महामुनी, दिनेश भराडीया, अमोल लोमटे, धम्मा सरवदे, कचरू सारडा, किशोर परदेशी, अंकुश हेडे, जावेद गवळी, पंडित हुलगुंडे, सुभाष पाणकोळी, खलील जाफरी, रशीद भाई,दत्ता सरवदे, गोविंद पोतंगले, रोहन कुरे,अकबर पठाण, विशाल पोटभरे यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.

## जायकवाडीतून पाणी सोडल्याने शेतकऱ्यांना दिलासा

**गेवराई । प्रतिनिधी**

पावसाने दडी मारल्यामुळे खरीपाची पिके धोक्यात आली आहेत. पुरेसा पाऊस नसल्याने जमीनीचा ओलावा कमी होत आहे. ऊस, कापूस, सोयाबीन यांसारख्या नगदी पिकांची वाढ खुंटली आहे. दुबार पेरणीच्या संकटामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले दिसते. जायकवाडी धरणाच्या कालव्यातील पाण्याच्या नियोजनासंदर्भात मंगळवार, दि.१५ जुलै २०२५ रोजी जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे महत्वाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी कालव्यातून सिंचनासह माजलगाव धरणासाठी पाणी सोडण्याची मागणी केली होती. मंत्री महोदयांनी ही मागणी मान्य करून पाणी सोडण्याचा निर्णय घेतला, त्यानुसार बुधवार, दि.१६ जुलै रोजी दुपारी ४ वाजता जायकवाडी जलाशयातून माजलगाव धरणासह सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

या बैठकीत गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्यातून माजलगाव धरण आणि शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी सोडण्याची विनंती केली होती. या बैठकीत उपस्थित



लोकप्रतिनिधींनी सुध्दा अशा प्रकारची मागणी लावून धरली. त्यांच्या मागणीची दखल घेऊन कालव्यात पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. बुधवार, दि.१६ जुलै रोजी दुपारी ४ वाजता जायकवाडी जलाशयातून माजलगाव धरणासह सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून काही प्रमाणात त्यांच्या पिकांना जीवनदान मिळणार आहे. यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# केज येथे दिव्यांग, जेष्ठांना कृत्रिम साहित्य देण्यासाठी १०६७ जणांची तपासणी

## खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते शिबीराचे उद्घाटन






**केज । प्रतिनिधी**

जिल्हा समाज कल्याण विभाग बीड व एलिम्को मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्या मध्ये दिव्यांगांना व जेष्ठ नागरीकांना मोफत कृत्रिम साहित्य साधने वाटप करण्याच्या अनुषंगाने दि.१८ जुलै रोजी पंचायत समिती येथे पूर्व तपासणी शिबीर संपन्न झाले. शिबीराचे उद्धाटन खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते झाले असून शिबीरात १०६७ जणांची तपासणी करण्यात आली.

यावेळी तहसीलदार राकेश गिड्डे,समाज कल्याण अधिकारी मेश्राम,गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने,डॉ.थोरात, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गवळी, गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर, अलिम्को संस्थेची सर्व टिम,ज्ञानेश्वर चौरे, शंकर जाधव,पिंटू ठोंबरे,बंडू चौधरी यांची उपस्थिती होती.या शिबीरामध्ये दिव्यांगांना जयपुरी फुट,कृत्रिम हात,कॅलीपर,व्हिल चेअर,ट्रायसिकल, क्रचेस,वॉकींग स्टीक, ब्रेल किट,स्मार्ट फोन, श्रवणयंत्र या सह जेष्ठ नागरीका करीता बेल्ट, वॉकर,काठया,चष्मे, कृत्रिम दात,खुबड, कृत्रिम अवयव,कानाची मशिन,व्हिलचेअर कमोडसहीत,सिलीकॉन खोम तकीया,नीब्रेस, स्पायनल सपोर्ट, सरवायकल कॉलर या सह इतर साहित्य वाटप करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने पुर्व तपासणी शिबीर त्या-त्या तालुक्यातील पंचायत समितीमध्ये आयोजित करण्यात येत आहे.दि.१८ जुलै रोजी केज येथे सदर शिबीराचे उद्घाटन खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते झाले.

### अशी झाली तपासणी

मुकबधीर १६५,मतिमंद ८४,अंध १२०, अस्थिव्यंग ४१६,जेष्ठ नागरिक ९२,मतिमंद -उमरी ७५,मुकबधीर - उमरी ७५,अस्थिव्यंग- केज ३५,एकूण १०६७

### शिबीराबाबत अधिक माहिती

अंबाजोगाई १९ जुलै पंचायत समिती,बीड २१ जुलै पंचायतसमिती
,माजलगाव २२ जुलै पंचायत समिती,पाटोदा २३ जुलै पंचायतसमिती
,वडवणी २४ जुलै पंचायत समिती,आष्टी २५ जुलै पंचायतसमिती
,धारूर २६ जुलैपंचायत समिती,परळी २८ जुलै पंचायत समिती,शिरूर २९ जुलै पंचायतसमिती
,गेवराई ३०जुलैपंचायत समिती या ठिकाणी तपासणी करण्यात येणार आहे.

### आवश्यक कागदपत्रे

दिव्याग: दिव्यांग प्रमाणपत्र आणि युडीआयडी कार्ड, आधार कार्ड,वार्षीक उत्पन्नाचा दाखला/रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे मासिक २२५०० किंवा वार्षीक २७०००० च्या आत,व जेष्ठ नागरिकांसाठी आधार कार्ड,वार्षीक उत्पन्नाचा दाखला/रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे (मासिक १५००० किवा वार्षीक १८०००० च्या आत असावे.अशी माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी, एस.एन.मेश्राम यांनी दिली आहे.

# प्राचार्य डी.जी.तांदळे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर बचाव मंच परिवाराचे प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डी.जी. तांदळे सर (दादा) यांचा ७० वा वाढदिवस बीड शहर बचाव मंचच्या वतीने शहरातील विविध क्षेत्रातील यशस्वीपणे कार्य करणाऱ्या मान्यवरांकडून मोठ्या उत्साहाने शहरातील राजाभाऊ वंजारे, छायाताई सरोदे, अभिजीत वैद्य संचलित 'जिव्हाळा' बेघर निवारा केंद्र परिवारासमवेत साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी सोबत काम करताना आलेले अनुभव व जुन्या नव्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी डी.जी. दादांनी आयुष्यभर केलेल्या कार्यावर सर्वांनी प्रकाशझोत टाकून मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या तसेच त्यांच्या उदंड आयुष्याची ईश्वरचरणी कामना केली. उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी मोठ्या सन्मानाने आदरपूर्वक सत्कार करत डी.जी. दादांना मनःपूर्वक भरभरून हार्दिक शुभेच्छा देऊन त्यांचा ७० वा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला. कॉम्रेड नामदेव चव्हाण, राजकुमार कदम, बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष नितीन जायभाये, पत्रकार बालाजी जगतकर, व जेष्ठ समाजसेवक मुकरमजानभाई पठाण, मंचचे कायदेशीर सल्लागार ड. अनिलजी बारगजे, ड. नितीनजी वाघमारे, (इस्लामपुरा) माजी नगरसेवक फारूक सय्यद, आ.प.चे जि. अ.अशोकराव येडे, इंटक काँग्रेसचे जि. अ. रामधनभाऊ जमाले, सेवानिवृत्ती पीएसआय बाबासाहेब जायभाये, वाहतूक नियंत्रण विभागाचे पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मिसाळ, कृषी विभागाचे बाबासाहेब कोकाटे, मातोश्री विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. डी. नागरगोजे, सेवानिवृत्त चौरे सर, सिटी हॉटेल ग्रुपचे परवेज कुरेशी, आप तक न्यूज चॅनलचे संचालक इमरोज भाई शेख ,गोंधळी समाजाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रभाऊ काटे आदी मान्यवर शुभेच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'नाही रे' वर्गासाठी सदैव कार्यरत राहणे गरजेचे-प्राचार्य डी.जी.तांदळे

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षक नेते तसेच विविध संघटनेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात पुढाकार घेणारे,बीड शहर बचाव मंच परिवाराचे मार्गदर्शक प्राचार्य डी.जी. तांदळे चा ७० वा वाढदिवस बीड शहर बचाव मंच व मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने दि. १७ जुलै २०२५ रोजी शहरातील भाजी मंडई येथील बेघरांच्या जिव्हाळा केंद्रात विविध सामाजिक संघटनांचे राजकीय पक्षांचे प्रमुखांच्या तसेच अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शहरातील विविध क्षेत्रातील यशस्वीपणे कार्य करणाऱ्या मान्यवरांकडून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी प्राचार्य डी.जी.तांदळे यांनी सत्कारा निमित्त आभार व्यक्त करताना, आपण सर्वजण गाडगे बाबांचे जमेल तितकं तरी कार्य करूया उपाशी आहेत त्यांना अन्न ,उघडे आहेत त्यांना वस्त्र ,आरोग्य ,शिक्षण, निवारा देण्याचा प्रयत्न आपण सर्वजण मिळून करूया निदान सहकार्य तरी करूया नाही रे वर्गासाठी आपण सर्वजण मिळून कार्यरत राहून वंचितांना,बेघरांना मदतीचा हात देऊया



असे मत डी.जी.तांदळे यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी सोबत काम करताना आलेले अनुभव व जुन्या नव्या आठवणींना उजाळा दिला यावेळी डी.जी.तांदळेनी आयुष्यभर केलेल्या कार्यावर सर्वांनी प्रकाशझोत टाकून मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच त्यांच्या उदंड आयुष्याची ईश्वरचरणी कामना केली.उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी मोठ्या सन्मानाने आदरपूर्वक डी.जी.तांदळेचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत सर्वांनी मनःपूर्वक भरभरून हार्दिक शुभेच्छा देऊन त्यांचा ७० वा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात डी.जी.तांदळेनी आपल्या मनोगत द्वारे ड.नितीन वाघमारे, मातोश्री विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नागरगोजे, कृषी विभागाचे बाबासाहेब कोकाटे ,पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मिसाळ, शिक्षक एस.एम. चौरे ,मुकरमजान पठाण, नगर परिषदचे सदस्य फारूक सय्यद,आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, इंटक काँग्रेस कामगार पक्षाचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, डॉ. लक्ष्मण पवळ, आज तकचे पत्रकार शेख इम्रोज आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात नुकतेच सेवानिवृत्त झालेले पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब जायभाये,शिवाजी भारती, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिवाजी चौधरी, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अभियंता सुभाष चाटे ,जिल्हा परिषदेचे आदर्श शिक्षक अनिल जाधवर, समाजसेवक मुकरमजान पठाण, परवेज भाई कुरेशी,पत्रकार शेख इब्रोंज आदींना मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ड. अनिल बारगजे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बीड शहर बचाव मंचचे अध्यक्ष नितीन जायभाये होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिव्हाळा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, सूत्रसंचालन मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार जिव्हाळा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे यांनी मानले.शेवटी जिव्हाळा केंद्रातील सर्व बेघरांना डी.जी.तांदळे सरांच्या वतीने काळजीवाहक व्यवस्थापिका छाया सरोदे यांनी भोजन दिले. कार्यक्रमात जीव्हाळा केंद्रातील निराधार,बेघर लाभार्थ्यांनी जेवणाचा आस्वाद घेतला.

# राशनमाफियांवर गुन्हा नोंदवून परवाना रद्द करा भगवान बाबा युवा सेनेची प्रशासनाकडे मागणी

## कारवाई न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील होळ येथील राशन दुकानातून गरीबांसाठी आलेले ४४ क्विंटल धान्य काळ्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना धारूर पोलिसांनी दि.१४ जुलै रोजी टेम्पो(क्र.एम.एच. ४४ यू २२५७) पकडून मोठा काळाबाजार उघडकीस आणला आहे.उपसरपंच बाळासाहेब घुगे यांच्या कोलंबस सहकारी संस्थे अंतर्गत चालणाऱ्या राशन दुकानातून त्यांचा भाऊ अशोक घुगे याच्या मार्फत हे धान्य विक्रीसाठी नेत असल्याचे उघड झाले असून,वाहन चालक इब्राहिम शेख याने पोलिसांसमोर स्पष्ट कबुली दिली आहे. याप्रकरणात धारूर पोलिसांनी गुन्हा दाखल करावा,अशी मागणी भगवान बाबा युवा सेनेच्या वतीने शुक्रवारी दि.१८ जुलै रोजी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

भगवान बाबा युवासेनेचे अध्यक्ष विजय बापु केंद्रे यांच्या नेतृत्वाखाली अंबाजोगाईचे उप जिल्हाधिकारी दीपक वजाळे यांना निवेदन देण्यात आले.यावेळी युवा नेते धनराज लाटे, राम घुगे,पत्रकार उत्तरेश्वर शिंदे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. निवेदनात म्हटले की, धारूर येथील महसूल व पोलिस



प्रशासनाने टोलवाटोलवी न करता होळ येथील राशन दुकानदार व उपसरपंच बाळासाहेब घुगे,अशोक घुगे यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करावा. संबंधित राशन दुकानाचा परवाना रद्द करावा.पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्यांनी घेतलेले जवाब दुकानदाराच्या नातेवाईकांसमोर दबावाखाली घेतले गेले असून,ते ग्राह्य धरू नयेत.दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करून धान्य काळाबाजार प्रकरणाचा सखोल तपास करण्यात यावा. या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडले जाईल अथवा न्यायालयात दाद मागण्यात येईल,असा इशाराही देण्यात आला आहे.

### राशन दुकान तपासणी तही २ क्विंटलचा घोळ!

पुरवठा निरीक्षण अधिकारी सुजाता मेश्राम यांनी राशन दुकानाची तपासणी केली.त्यांनी तहसीलदारांना दिलेल्या अहवालात होळच्या राशन दुकानात ई पॉस मशीनवरील नोंदीपेक्षा ८९ किलो तांदूळ कमी आढळून आला.तर, १ क्विंटल ९ किलो गहू जास्त सापडला.याचा अर्थ अंगठे घेऊन लाभार्थ्यांना गहू दिला नाही.सदरील अहवाल वर जिल्हा पुरवठा विभागाला सादर केला जाणार आहे.दरम्यान, याप्रकरणात राशन माफियांचा पुरवठा विभागावर राजकीय दबाव असल्याचा आरोप केला जात आहे.

### धारूर पोलिसांचे राशन माफियांशी लागेबांधे

धारूर पोलिसांनी स्वस्त धान्य पकडले.या प्रकरणात वाहन चालकाने कबुली देऊनही पोलिसांनी फिर्याद दिली नाही. त्यामुळे संताप व्यक्त केला जात असून धारूर पोलिसा विरोधात आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# बीडमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम



**बीड । प्रतिनिधी**

जीवनाच्या संध्याकाळी एकटेपणा न बाळगता, सकारात्मक, आनंदी व ताणतणावमुक्त राहावे. मन प्रसन्न ठेवण्यासाठी छंद जोपासावेत व सतत कार्यरत राहावे, असे मत डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा, बीड आणि सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (काकू) महाविद्यालय, नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी 'संधीकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशा' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात गणेश वंदना, गीत, योगनृत्य, मंगळागौरी गीते, भारूड, फील्मी गीते, गजल गायन, एकपात्री अभिनय, विनोदी काव्य, झुंबा नृत्य, काव्यवाचन, उखाणे, मुशायरा अशा विविध कलाप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. जिल्हाभरातून २०० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रंगतदार सादरीकरण केले. कार्यक्रमाला डॉ. सारिका क्षीरसागर, प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, डॉ. संजय पाटील देवळाणकर आदींची उपस्थिती होती. सहभागी ज्येष्ठांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन डॉ. दुष्यंता रामटेके यांनी केले, तर आभार डॉ. अनिता शिंदे यांनी मानले. डॉ. राहुल सोनवणे, प्रा. दीपक जमधाडे, प्रा. सुरेश थोरात, इंद्रजीत भांगे यांनी संगीताची साथ दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. विजय राख, प्रा. सोनाली गवारे, प्रा. नागेश शेटे, मिलिंद शिवणीकर, नामदेव साळूंके यांनी सहकार्य केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077